RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




रविवार, ०६ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : १०१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 06 April 2025 | Year : 5 | Issue : 101 | Daily | Rate: Rs. 5/-

### अडीच बिघा जमीन असलेल्या शेतकऱ्याला

## प्राप्तीकरची 30 कोटींची नोटीस

**मथुरा :** ज्येष्ठ अभिनेत्री आणि भाजपच्या खासदार हेमामालिनी यांचा मतदारसंघ असलेल्या मथुरा (उत्तरप्रदेश) येथून एक विचित्र प्रकार समोर आला आहे. मथुरेत केवळ अडीच बिघा जमिन असलेल्या एका शेतकऱ्याला प्राप्तीकर विभागाने चक्क 30 कोटी रूपयांची नोटीस पाठवल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या शेतकऱ्याला धक्का बसला आहे. सध्या पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. सौरभ कुमार असे या शेतकऱ्याचे नाव आहे. विशेष म्हणजे, या नोटीसीमुळे येथील एक स्कॅम उघडकीस आला आहे. सौरभ कुमार यांच्या नावावर केवळ अडीच बिघा (साधारण सव्वा एकर) शेतजमिन आहे. 26 मार्च रोजी त्यांना तब्बल 16 कोटींची नोटीस प्राप्तीकर खात्याने पाठवली आहे. सौरभ कुमार यांच्या पॅन कार्डचा वापर करून काही अज्ञातांनी दोन बनावट कंपन्यांद्वारे कोट्यवधी रुपयांचा व्यवहार केला. त्यामुळे ही नोटीस




पाठवली गेल्याचे स्पष्ट झाले आहे.

शुक्रवारी सौरभ कुमार यांनी पोलिस अधीक्षकांना याबाबत पत्र देत बनावट कागदपत्रांबाबत तक्रार केली आहे. सौरभ कुमार यांना 26 मार्च रोजी प्राप्तीकरने पोस्टाद्वारे ही नोटीस पाठवली होती. नोटीस पाहून ते आश्चर्यचकीत झाले होते. तसेच त्यांना आता पुढे काय करायचे, याची चिंता लागून राहिली होती. सौरभ यांच्या माहितीनुसार त्यांच्या पॅन कार्डवर दोन जीएसटी नंबर घेतले गेले आहेत. त्याच्या माध्यमातून सुमारे 30 कोटी रुपयांचा व्यवहार झाला आहे.

**वर्ष 2022 मध्येही 14 कोटींचा नोटीस**

सौरभ कुमार यांनी सांगितले की, सन 2022 मध्येही त्यांना आयकर विभागाकडून 14 कोटी रुपयांची नोटीस प्राप्त झाली होता. तेव्हा काही अज्ञातांनी मुद्दाम देण्यासाठीच हे केल्याचे लक्षात आले. त्यांनी वकीलामार्फत प्राप्तीकर विभागाला कोणताही जीएसटी नंबर घेतला नसल्याचे प्रत्युत्तर दिले. दरम्यान, 26 मार्च रोजी 16 कोटी रुपयांच्या व्यवहाराबद्दल त्यांना पुन्हा नोटीस आली.

सौरभ यांच्या पॅन कार्डवर एक जीएसटी नंबर 'एचएआर इंटरप्राइजेज' यांच्या नावाने घेतला गेला आहे तर दुसरा 'कविता इंडस्ट्रीज' यांच्या नावाने. हे दोन्ही जीएसटी नंबर दिल्लीतील पत्त्यावर घेतले गेले आहेत. सध्या हे दोन्ही जीएसटी नंबर रद्द केले गेले आहेत. आता सौरभ कुमार यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिली आहे. पोलिस या प्रकरणाची तपासणी करत आहेत.

## 'वक्फ'ला पाठिंबा दिल्याने भाजपाच्या मित्रपक्षांची कोंडी ?

**नवी दिल्ली :** प्रदीर्घ चर्चा, आरोप-प्रत्यारोपाच्या फैरीनंतर वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात बहुमताने मंजूर करण्यात आले. या विधेयकावर लोकसभा आणि राज्यसभेच्या सभागृहात वादळी चर्चा झाली. विरोधकांच्या इंडिया आघाडीतील घटकपक्षांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाला तीव्र विरोध केला होता, त्यामुळे ते मंजूर करण्यासाठी सत्ताधाऱ्यांची चांगलीच कसोटी लागली; तर भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटकपक्ष विधेयकाच्या बाजूने उभे होते, ज्यात नितीशकुमार यांचा जेडीयू आणि चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगु देसम पार्टीचाही समावेश होता. भाजपाच्या या दोन्ही मित्रपक्षांनी लोकसभा व राज्यसभेत विधेयकाच्या बाजूनेच मतदान केले.

तेलुगु देसम व जेडीयू या दोन्ही पक्षांची आंध्र प्रदेश आणि बिहार या राज्यांमध्ये सत्ता आहे. विशेष बाब म्हणजे, या राज्यात मुस्लीम समाजाचे मोठे प्राबल्य आहे. त्यामुळे वक्फ विधेयकाच्या बाजूने मतदान केल्याने या दोन्ही पक्षांविरोधात राज्यात नाराजीचा सूर दिसून येत आहे. नितीशकुमार यांच्या पार्टीतील नेत्यांनी धडाधड राजीनामे टाकण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत जेडीयूच्या पाच मुस्लीम नेत्यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याची माहिती आहे. वक्फ विधेयकाला पाठिंबा दिल्याने जेडीयूच्या अल्पसंख्याक सेलचे राज्य सचिव मोहम्मद शाहनवाज



मलिक, राजू नय्यर, प्रदेश सरचिटणीस सई मोहम्मद, तबरेज सिद्दीकी अलिग, भोजपूरचे पक्षाचे सदस्य मोहम्मद दिलशान रैन आणि मोहम्मद कासिम अन्सारी यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. जेडीयूने मुस्लीम समाजाचा विश्वास तोडला असून हे पाऊल धर्मनिरपेक्ष प्रतिमेच्या विरोधात आहे, असा आरोप या नेत्यांनी केला आहे. दुसरीकडे जेडीयूने मात्र त्यांचे हे दावे फेटाळून लावले आहेत. पक्षाला सोडचिठ्ठी देताना राजू नय्यर यांनी राजीनामा पत्रात लिहिले, 'जेडीयूने वक्फ विधेयक मंजूर करण्यासाठी सभागृहात पाठिंबा दिल्यामुळे मी राजीनामा देत आहे. मुस्लिमांच्या विरोधात असलेल्या या काळ्या कायद्याला पक्षाने पाठिंबा दिल्यामुळे मला अतीव दुःख होत आहे. मी माझ्या सर्व पदांचा आणि प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. मला सर्व जबाबदाऱ्यांमधून मुक्त करण्यात यावे.'

## 'समृद्धी'वर लवकर पोहचायचे ? आमदारांनी सुचवला 'शॉर्टकट'!



**बुलढाणा :** हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गसंदर्भातील ही बातमी असली तरी ती अपघाताची नाही, तर ती या महामार्ग संदर्भातील 'गुड न्यूज' असून असून हजारो प्रवाशांसाठी उपयुक्त ठरणारी बातमी आहे. राज्याची उपराजधानी नागपूर ते राजधानी अर्थात नागपूर - मुंबईला कमी वेळात जोडणाऱ्या समृद्धी महामार्गावर बुलढाणा व चिखली भागातून मेहकरनजिक प्रवेश आणि बाहेर पडण्याकरिता दहा ते बारा किलोमीटरचा फेरा घ्यावा लागतो. शिवाय मालवाहक वाहने, प्रवासी वाहनांना मेहकर शहरातील विस्कळीत रहदारीचादेखील सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेता अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे यांनी राज्य सरकारकडे अभ्यासपूर्ण मागणी केली होती. यासाठी पोचमार्गाचा पर्याय त्यांनी सुचविला होता. यासंदर्भात नवीन पोचमार्ग तयार करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) दोन पर्यायांवर सकारात्मक हालचाली सुरू केल्या आहेत. त्या संदर्भाचे पत्र देखील आमदार धीरज लिंगाडे यांना प्राप्त झाले आहे.

## उच्च न्यायालयाने महापालिकेला सुनावले असमान सिमेंट रस्त्यांवरून खडेबोल




**नागपूर :** नागपूर शहरात महापालिकेच्यावतीने रस्त्यांचे सिमेंटीकरण केले जात आहे. सिमेंटचे रस्ते तयार केल्यामुळे त्यांची उंची वाढली आणि परिसरातील घरात पाणी शिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बेजबाबदारपणे तसेच नियोजन न करता सिमेंटचे रस्ते तयार केले गेले आहे. उच्च न्यायालयाने महापालिकेला असमान सिमेंट रस्त्यांवरून खडेबोल सुनावले. सिमेंटच्या रस्त्यांवरून न्यायालयाने थेट महापालिका आयुक्तांनीही न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या उपस्थितीत न्यायालयाने वाहने हवेत उडत असल्याची मौखिक टिप्पणी केली.

## एचएसआरपी नंबर प्लेट गुजरातपेक्षा महाराष्ट्रात महाग का ?



**नागपूर :** देशभरात 2019 पूर्वी निर्मित सर्व वाहनांमध्ये हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातही नंबर प्लेट बदलवले जात आहेत. मात्र गुजरात, आंध्रप्रदेशसारख्या इतर शेजारी राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक दर का आहेत, असा प्रश्न उपस्थित करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयाने राज्य परिवहन आयुक्तांना तीन आठवड्यात जबाब नोंदवण्याचे आदेश दिले. सुदर्शन बागडे यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. याचिकेनुसार, देशासह संपूर्ण राज्यात एचएसआरपी प्लेट लावण्यात येत आहे. याचा आर्थिक भार वाहनचालकांवर बसत आहे. 2018 साली सर्वोच्च न्यायालयाने एचएसआरपीबाबत निर्णय देताना स्पष्ट केले होते की, वाहनांमध्ये वापरण्यात येणाऱ्या इंधनाचे वर्गीकरण करण्यासाठी विविध रंगांचे होलोग्राम स्टिकर्स लावावे. यामागे रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमांची अंमलबजावणी करणे हा उद्देश होता. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना नंबर प्लेटच्या दरांबाबत काहीही सांगितले नव्हते. त्यामुळे देशातील राज्यांमध्ये वेगवेगळ्या दर आकारण्यात येत आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक वाहनसंख्या आहे, मात्र तरीही सर्वाधिक दर आकारला जात आहे. याचा भुर्दंड नागरिकांना बसत आहे. त्यामुळे राज्यात मुबलक दरात 'एचएसआरपी' प्लेट उपलब्ध होईपर्यंत यावर बंदी घालण्यात यावी, सर्व भागात समान दर असावे, अशी मागणी याचिकाकत्याने केली आहे. याचिकेवर पुढील सुनावणी 25 एप्रिल रोजी होईल.

## शेतकऱ्यांना आर्थिक मदत करता म्हणजे उपकार करता का? : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे, पण त्याचा अपमान करण्याची एकही संधी भाजपा युती सरकार सोडत नाही. राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटेंना सत्तेचा एवढा माज चढला आहे की, ते सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. शेतकऱ्यांना भिकारी म्हटल्यानंतर आता या महाशयांनी कर्जमाफीचे काय करता, लग्न-साखरपुडे करता, शेतीत गुंतवता का? असा प्रश्न विचारून पुन्हा एकदा अपमान केला आहे. शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या कोकोटेंना मंत्रिमंडळातून हाकलून द्या, 'अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, 'सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते, ते अद्याप पाळलेले नाही. कर्जमाफीसाठी पैसे नाहीत असे सरकार म्हणते. त्यात कर्जमाफीवरून कृषिमंत्र्यांचा शेतकऱ्यांना प्रश्न म्हणजे 'चोर तो चोर आणि वरून शिरजोर' असा प्रकार आहे. शेतकऱ्याला सरकार मदत करते किंवा कर्जमाफी करते म्हणजे काही उपकार करत नाही. तो जनतेचा पैसा आहे, कोकाटेच्या घरचा नाही. सरकारची धोरणे जर शेती व शेतकऱ्याला अनुकुल असती तर शेतकरी सरकारच्या मदतीवर कशाला अवलंबून राहिल. पण भाजपा युती सरकार हे शेतकरीविरोधी आहे. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत.' 'मूठभर उद्योगपतींना 16 लाख कोटींचे कर्जमाफ केले तेव्हा असा प्रश्न विचारण्याची धमक कोकाटे किंवा सरकारने दाखवली नाही. मग शेतकऱ्यांनाच प्रश्न विचारण्याची हिंमत का होते? कोकाटेंनी यापूर्वीही भिकारीसुद्धा एक रूपया घेत नाही. आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयांत विमा देते असे वक्तव्य करून शेतकऱ्यांचा अपमान केला होता. सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करण्याचा रोग या महोदयांना जडला आहे. त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांची माफी मागावी,' अशी मागणी केली.

## आरएसएसला ख्रिश्चनांकडे वळण्यास फार वेळ लागला नाही : राहुल गांधी



**नवी दिल्ली :** वक्फ सुधारणा विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहांची मंजूर मिळाली. हे विधेयक आता राष्ट्रपतींकडे जाईल आणि त्यांची स्वाक्षरी झाल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर होईल. दरम्यान, हे सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक बातमी पोस्ट करत आरएसएसला ख्रिश्चनांकडे जाण्यास वेळ लागला नाही, असे म्हटले आहे. वक्फ बिलाबद्दल मांडलेल्या भूमिकेचा उल्लेख करत राहुल गांधींनीराष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली आहे. राहुल गांधी यांनी एका इंग्रजी दैनिकाने दिलेले वृत्त एक्स सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केले आहे. राहुल गांधींनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'मी म्हणालो होतो की, वक्फ विधेयक आता मुस्लिमांवर हल्ला करत आहे. पण, त्याचबरोबर ते भविष्यात इतर समुदायांना लक्ष्य करण्यासाठी ते एक पायंडा पाडत आहे.' 'आरएसएसची नजर ख्रिश्चनांकडे जाण्यास फार वेळ लागला नाही. संविधान ही एकमेव ढाल आहे जी आपल्याला अशा हल्ल्यांपासून वाचवते. आणि त्याचे रक्षक करणे ही आपल्या सगळ्यांची सामुदायिक जबाबदारी आहे', असे भाष्य राहुल गांधींनी केले आहे.

## चौथ्या रेल्वेमार्गाचे काम सुरु, 15 एप्रिलपासून या गाड्यांचे संचालन रद्द



**गोंदिया :** ईस्ट कोस्ट रेल्वेच्या खुर्दा मार्ग रेल्वे विभागांतर्गत असलेल्या मेरामंडली-हिंदोल मार्ग विभागातील तिसरा व चौथा रेल्वेमार्ग मेरामंडली स्टेशनला ब्लॉक घेऊन जोडण्याचे काम केले जाईल. हे काम 15 ते 24 एप्रिल 2025 या कालावधीत केले जाणार आहे. ज्या अंतर्गत दक्षिण पूर्व मध्य रेल्वे अंतर्गत गोंदिया रेल्वे स्थानकावरून जाणाऱ्या गाड्यांचे संचालन पूर्णपणे रद्द राहील. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील प्रवासी ज्यांनी खालील रद्द करण्यात आलेल्या एक्सप्रेस गाड्यांचे आगाऊ आरक्षण केलेले आहे त्यांना यामुळे त्रास होणार आहे. त्यांना या रद्द करण्यात आलेल्या गाड्यांमधील आपल्या ठरलेल्या प्रवासाकरिता पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे. विरुद्ध दिशेने देखील, ट्रेन रक्सौल-चारलापल्ली विशेष ट्रेनचे संचालन दर गुरुवारी रक्सौल येथून धावणारी ट्रेनची वेळ 31 जुलै 2025 पर्यंत वाढविण्यात आली आहे. गोंदिया आणि राजनांदगाव स्थानकांवर चारलापल्ली-रक्सौल विशेष ट्रेनचे टेबल. ही गाडी आता गोंदिया स्थानकात 7.50 ऐवजी 8.10 वाजता पोहोचेल. त्यामुळे ती राजनांदगाव स्थानकात 9.28 ऐवजी 9.30 वाजता पोहोचेल अशी माहिती दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे वाणिज्यिक व्यवस्थापक दिलीप सिंह यांनी दिली आहे.

## राष्ट्रीय विधि विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर हजारो रुपयांचा दंड!

**नागपूर :** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब झाल्याने त्यांचे शैक्षणिक शुल्क वेळेत जमा झाले नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांवर पाचशे रुपये प्रति दिवस प्रमाणे विलंब शुल्क लावण्यात आले. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग व अन्य प्रवर्गातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या दंडाची रक्कम तर 30 ते 50 हजार रुपयांपर्यंत गेली आहे. विलंब शुल्क जमा न करणाऱ्यांचे निकाल व परीक्षा प्रवेशपत्रही अडवून ठेवण्यात आले आहेत. केंद्र व राज्य सरकारकडून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु, दरवर्षी वेळेत शिष्यवृत्ती मिळत नाही. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्यास अनेकदा



कागदपत्रांची अडवणूक केली जाते. मात्र, नागपूरचे महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ याच्याहीपुढे जात विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क वसूल करत आहे. विद्यापीठात 900 विद्यार्थी क्षमता आहे. यात 400 विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक आहेत.

प्रथम वर्षाचे शुल्क अंदाजे 3 लाख 60 हजारांच्या घरात आहे. विद्यार्थ्यांना अडीच लाखांपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाते. वरचे पैसे विद्यार्थी स्वतः जमा करतात. परंतु, शिष्यवृत्ती जमा न झाल्याने विद्यापीठ चक्क प्रति दिवस 500 रुपयेप्रमाणे विलंब शुल्क घेत आहे. बी.ए. एलएल.बी. (ऑनर्स) च्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश आहे. आर्थिक मागास घटकातील हे विद्यार्थी विलंब शुल्क भरू शकत नसल्याने त्यांचे उन्हाळी परीक्षेचे प्रवेशपत्र अडवण्यात आले आहेत. तसेच त्यांचा हिवाळी परीक्षेचा निकालही दाखवण्यात आलेला नाही. शासनाकडूनच शिष्यवृत्ती उशिरा येत असेल तर सामान्य विद्यार्थ्यांनी शुल्क कुठून द्यावे, शासनाच्या चुकांची शिक्षा विद्यार्थ्यांना का, असा प्रश्न स्टुडंट्स राईट्स असो. ऑफ इंडियाचे उमेश कोरांम यांनी उपस्थित केला.

## बनावट डॉक्टर करत होता हृदय शस्त्रक्रिया, एका महिन्यात 7 मृत्यू



**भोपाळ :** मध्य प्रदेशमध्ये एक अत्यंत धक्कादायक बाब समोर आली असून एक बनावट डॉक्टर रुग्णांच्या हृदय शस्त्रक्रिया करत असलेल्या प्रकार समोर आला आहे. मध्य प्रदेशातील दामोह शहरातील एका खाजगी मिशनरी रुग्णालयात हा प्रकार घडला आहे. येथे एका बनावट डॉक्टरने रुग्णांवर हृदय शस्त्रक्रिया केल्याच्या आरोपांची सध्या जिल्हा अधिकारी चौकशी करत आहेत. दरम्यान या तोतया डॉक्टराने शस्त्रक्रिया केलेल्या किमान 7 जणांचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. रुग्णालयात एका महिन्याच्या आत सात जणांचा मृत्यू झाल्यानंतर या गोष्टीकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. एन जॉन केम नावाचे प्रसिद्ध ब्रिटिश डॉक्टर आपणच असल्याचे भासवून, या व्यक्तीने ख्रिश्चन मिशनरी रुग्णालयात हृदयरोग तज्ज्ञ म्हणून पदभार स्वीकारल्याचा आरोप आहे. यानंतर या बनावट डॉक्टरने रुग्णांवर हृदय शस्त्रक्रिया देखील केल्या. या शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांचा नंतर मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेच्या तपासानंतर आरोपीचे खरे नाव हे नरेंद्र विक्रमादित्य यादव असल्याचे उघड झाले. दरम्यान बाल कल्याण समितीचे जिल्हा अध्यक्ष आणि वकील दीपक तिवारी यांनी मात्र या प्रकरणात खळबळजनक दावा केला होता. या प्रकरणातील अधिकृत मृत्यूंची संख्या 7 असली तरी प्रत्यक्षात ही संख्या खूप जास्त असल्याचे तिवारी म्हणाले होते. तसेच त्यांनी दमोह जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य प्रियांक कानूंगो यांनी सांगितले की त्या मिशनरी रुग्णालयाला सरकारकडून आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पैसेही मिळत होते. 'मिशनरी रुग्णालयात एक बनावट डॉक्टर रुग्णांवर शस्त्रक्रिया करत असल्याची आम्हाला तक्रार मिळाली. आम्हाला असेही सांगण्यात आले की मिशनरी रुग्णालय हे आयुष्मान भारत योजनेशी जोडलेले आहे आणि त्यासाठी सरकारकडून ते पैसे देखील घेत आहेत. आम्ही या प्रकरणाची दखल घेतली आणि याचा तपास सुरू आहे,' असे प्रियांक कानूंगो म्हणाले.

## न्या. वर्मांनी घेतली अलाहाबाद हायकोर्टाच्या न्यायाधीशपदाची शपथ



**नवी दिल्ली :** न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी आग लागल्याच्या घटनेनंतर बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याची माहिती समोर आली होती. या घटनेमुळे यशवंत वर्मा हे चांगलेच चर्चेत आले होते. यानंतर या प्रकरणाची देशभरात मोठी चर्चा झाली. यानंतर या प्रकरणात अंतर्गत चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयाने तीन सदस्यांची समिती देखील स्थापन करण्याचा निर्णय घेतला. मात्र, न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी त्यांच्यावर करण्यात आलेले सर्व आरोप फेटाळून लावले होते.

या आरोपानंतर न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. यानंतर आता न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदाची शपथ घेतली आहे. मात्र, यशवंत वर्मा यांनी न्यायाधीशपदाची शपथ घेतली असली तरी त्यांच्याकडे कोणतेही न्यायालयीन कामकाज सोपवले जाणार नाही, अशी माहिती सांगितली जात आहे.




बहुजन सौरभ

वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!




११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले,
१४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
९ एप्रिल बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे



यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ

आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

जाहिरात दरपत्रक

| | |
|---|---|
| पान एक सप्तरंगीन | - पूर्ण पान - ६० हजार रूपये |
| | - अर्ध पान - ३० हजार रूपये |
| | - पाव पान - १५ हजार रूपये |
| अंतिम पान सप्तरंगीन | - पूर्ण पान - ५० हजार रूपये |
| | - अर्ध पान - २५ हजार रूपये |

शुभेच्छा जाहिरात २००० रू. पासून

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ,
वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे,
तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल -bahujansaurabh@gmail.com
संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

# दलित साहित्याचे भाष्यकार पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे

**स्वातंत्र्योत्तर काळातील ज्या वाङ्मयीन प्रवाहाने मराठी साहित्यात नवी दालने निर्माण केली. त्यात दलित साहित्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. अस्मितादर्श या नियतकालिकाने एक प्रगल्भ परंप निर्माण केली. कारण अस्मितादर्श हे दलित साहित्याचे मुखपत्र आहे. 27 मार्च 2018 रोजी डॉ. गंगाधर पानतावणे सर निघून गेल्याने जी पोकळी निर्माण झाली ती भरून निघणे कठीण आहे. सतत संघर्षरत राहत असताना गेल्या पाच दशकाच्या वर या नियतकालिकाने दलित साहित्य आणि दलित संस्कृतीचा अन्वयार्थ लावून या वाङ्मयीन जाणिवांना जोपासण्याचे फार मोठे कार्य केले आहे. मराठी साहित्यात विद्रोहाचा क्रांतिकारक उद्गार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रभावी आणि ऊर्जस्वल अशा तत्त्वज्ञानातून व्यक्त झाला आणि तो अस्मितादर्शने शिरोधार्य मानून मराठी साहित्यात एक नवा प्रवाह निर्माण केला.**



आंबेडकरी प्रेरणांचे आणि विचारांचे दर्शन मराठी साहित्यात घडू लागले. मराठी नियतलिकांच्या इतिहासातच नव्हे तर मराठी वाङ्मय निर्मितीच्या इतिहासातही अभूतपूर्व असे कार्य अस्मितादर्शने केले आहे. अस्मितादर्श आणि डॉ. गंगाधर पानतावणे हे समीकरण ठरलेले आहे. त्यांच्यामुळेच अस्मितादर्शला नवी ओळख मिळाली. सर जरी निघून गेले तरी दलित साहित्याचे भाष्यकार म्हणून डॉ. गंगाधर पानतावणे एक ओळख ठेवून गेले. त्यांचे विचार म्हणजे एक ऊर्जा केंद्र होते. त्यांच्या चिंतनातून दलित साहित्याला ठोस अशी दिशा मिळाली. विद्रोह, विज्ञान आणि विश्वमयता या सूत्रांचा प्रत्यक्ष नव्यानेच वाङ्मय निर्मितीच्या अभ्यासकांना त्यांनी परिचय करून दिला. कविता, कथा, नाटक, कादंबरी, वैचारिक लेखन, संशोधनपर लेखन अशा अनेक दालनात नवे आयाम त्यांनी मिळवून दिले.

आंबेडकरवाद हा दिखाऊपणाचा नसून तो कातळावर कोरणारा शिलालेख आहे. म्हणून आपल्या लेखनातून मूल्यवेध, विद्रोहाचे पाणी पेटले, मूकनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दलितांचे प्रबोधन, वादळाचे वंशज, प्रबोधनाच्या दिशा, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हलगी, चैत्य, दलित वैचारिक वाङ्मय, लेणी, साहित्यासंबंधीत साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती आम्हा विद्यार्थ्यांना अर्पण केलेला ग्रंथ 'शोध व संवाद' स्मृतीशेष, अर्थ आणि अन्वयार्थ, आंबेडकर जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता, बुद्धचिंतन, विद्रोह, विज्ञान आणि विश्वमयता, दलित साहित्याचे चर्चा आणि चिंतन, चर्चा आणि चिकित्सा, किल्ले पन्हाळा ते किल्ले विशालगड, दलित आत्मकथन, दलित कथा, विचार युगाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोक चळवळीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले, महाराजांचा सांस्कृतिक इतिहास, लोकरंग, स्त्री आत्मकथन, धम्मचर्चा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, डॉ. आंबेडकर अभिवादन ग्रंथ, प्रांत, निभ्रांत, दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश खंड एक-दोन-तीन, एवढी मोठी ग्रंथसंपदा त्यांनी निर्माण केली. ती सुद्धा अत्यंत दर्जेदार, दलित साहित्याची व्याख्या, व्याप्ती, भाषा त्यातला आशय वेगवेगळ्या परिसंवादातून, भाषणातून, मुलाखती, प्रस्तावना, संपादकीयातून मूलभूत विचार त्यांनी मांडले. सर विचारवंत नव्या वाटांचे दीपस्तंभही आहेत. त्यांच्या चिंतनातून दलितांच्या वाङ्मयीन चळवळीला, त्यांच्या सांस्कृतिक जीवनाला प्रतिरूपण करणारे माध्यम ठरले आहे. त्यांनी साहित्य, समाज अनेक क्षेत्रांमध्ये अनेक प्रश्नांची चिकित्सा केल्या गेली. सौंदर्यशास्त्राबद्दल त्यांची स्पष्ट भूमिका होती. ते म्हणतात, 'सौंदर्यशास्त्र ही संकल्पना पारंपरिक आहे. म्हणून मला सतत वाटत आले आहे की सौंदर्यशास्त्राच्या कुबड्या घेऊनच दलित साहित्य निर्मितीचे मूल्यमापन आवश्यक आहे का? दलित साहित्य पुराण साहित्य मूल्य आणि साहित्य सृष्टी नाकारते. अशा परिस्थितीत दलित साहित्याच्या मूल्यमापनात पारंपरिक सौंदर्यशास्त्र स्वीकारणे किंवा त्याची चर्चा करणे ही बाब मला अर्थपूर्ण वाटत नाही. साहित्य निर्मिती विविध अंगाने होणे हेच महत्त्वाचे जिवंत व समर्थ लेखन जिवंत अनुभूतीतूनच आकाराला येते. जे फोलकट असते ते जीव धरू शकत नाही. म्हणूनच दलित साहित्याने सौंदर्यशास्त्राच्या कल्पनेत स्वतःला अडकवून न घेता अस्सल व जिवंत साहित्य निर्मितीच आपला निकष मानावा.' विचारांची पारदर्शकता ही त्यांच्या मनाची ठेवण आहे. सत्य, असत्य याची बुज राखण्यासाठी कुणाची मुलाहिजा ते ठेवत नाहीत. तत्कालीक गर्दीचे कोंडाळं त्यांनी वाढविलेले नाही. तर कठीण प्रसंगातही तग धरून ठेवणाऱ्या मित्रांच्या तुकड्या त्यांनी निर्माण केल्या आहेत. इतरांना पटो अथवा न पटो आपले मत विरोधकांच्याही तंबूमध्ये जाऊन परखडपणे अभ्यासपूर्ण ते मांडत असायचे. परंतु कधी अहंतेचा स्पर्श होऊ दिला नाही. दलित कवितेची मीमांसा करीत असताना बाण्याची कविता, वाणांची कविता अशी चिकित्सा ते करतात. मराठी साहित्यातील उणिवा स्पष्ट करीत असताना दलित साहित्याचा समाचार ते घेतात. दलित साहित्याचे प्रेरणास्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आहेत हे ते प्रभावीपणे मांडत असायचे. दलित साहित्याला परिवर्तन वाद, क्रांती सन्मुखता, विद्रोह, विवेकवाद आणि वैज्ञानिकताच अभिप्रेत होती. (अध्यक्षीय भाषण, अखिल भारतीय प्रबुद्ध नाट्य संमेलन सोलापूर, जानेवारी 1999). दलित या संज्ञेला व पर्यायाने दलित या संकल्पनेलाच अस्मितादर्शच्या माध्यमातून व्यापक असा अर्थ व आशय त्यांनी मिळवून दिला हे नाकारता येणार नाही. डॉ. निर्मल कुमार फडकुले म्हणतात, 'अस्मितादर्शने एक साहित्यिक चळवळ उभी केली ही केवळ साहित्यिक चळवळ नसून दलितांच्या व्यापक लढ्याची व सांस्कृतिक आघाडी असा अस्मितादर्शचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी अस्मितादर्शला सांस्कृतिक संस्थात्मक रूप बनविले आहे.' जाती धर्म या पलीकडच्या माणसावरही प्रेम करता येते हे डॉ. पानतावणे सरांकडून शिकण्यासारखे आहे. आत्मोपम्यता हा त्यांचा गुणधर्मच होता. माणसे समाजात वावरतात ती आपली अनेक रूप घेऊन. कुणी अस्मिता जपतात, तर कुणी अहंकार अशा समाजातील व्यक्ती आणि प्रवृत्ती यांचा मर्मभेदी, दंभस्फोट, हलगी सारख्या पुस्तकातून केलेला आहे. आपल्या विशाल ग्रंथालयात दुर्मिळ पुस्तके अभ्यासताना सर नेहमी दिसायचे. एक मात्र खरे डॉ. पानतावणे विरोधकांच्या हल्ल्यांना परतवून लावण्याचे काम मोठ्या ताकदीने जेवढे करायचे त्या प्रमाणात दलित साहित्यिक आज फार कमी आहेत. म्हणून ते चालते बोलते विद्यापीठ होते. पानतावणे सर म्हणजे वादळाचे दुसरे नाव परंतु क्षमणारे ते वादळ नव्हते. विचारांच्या माध्यमातून घोंघावत राहणारे, घरादाराची पर्वा न करता सदोदित समाजमनाचा कानोसा घेणे हा त्यांचा धर्म. म्हणून या नात्याने अनेक साहित्य संमेलनात त्यांना आवर्जून बोलाविले गेले.

अस्मितादर्शमधून त्यांनी अनेक पिढ्या घडविलेल्या आहेत. डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात, 'प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या ठिकाणी दुसरा कोणी या नियतकालिकांचा संपादक असता तर या अडचणीवर मात करता आली असती किंवा नाही? याबाबतीत निदान मला तरी शंका आहे. पुढे ते म्हणतात, गंगाधर पानतावणे हे संघर्षाचे दुसरे नाव आहे. त्यांच्या अखेरपर्यंतच्या जिद्दीने प्रयत्नातूनच अस्मितादर्शला तेजाने तळपता आले व अनेक नवोदित दलित लेखकांस मराठी साहित्यात अस्मिता मिळवता आली. (अध्यक्षीय भाषण 1997, पृ. 13). विचारवंत, साहित्यिक घडविण्यासाठी मेळाव्याची आवश्यकता असते. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागातून महाराष्ट्राबाहेरही हे मेळावे भरविले गेले. यात मान्यवर लेखक आणि नवोदित लेखक यांचा संवाद घडला. पाहता पाहता या मेळाव्याचे रूपांतर एका साहित्य संमेलनामध्ये घडविले गेले. असंख्य नवोदित लेखकांनी या मेळाव्यापासून प्रेरणा घेऊन साहित्य निर्मितीचे संकल्प केले आहेत. ही मोठी उपलब्धी आहे. याचे सर्व श्रेय पानतावणे सर यांना निश्चितच जाते. यापुढे सुद्धा हे कार्य अधिक जोमाने होणे आवश्यक आहे. हीच त्यांना आदरांजली म्हणता येईल! ■ ■

**डॉ. चिंतामण कांबळे**
**मुर्तीजापूर, जि. अकोला**



# अगं, आपल्या जमान्यात मोबाइल नव्हते....

चष्मा साफ करता करता एक वयस्कर काका आपल्या बायकोला म्हणाले, 'अगं, आपल्या जमान्यात मोबाइल नव्हते.'

काकू, ' हो ना! पण बरोबर 5 वाजून 55 मिनिटांनी मी पाण्याचा ग्लास घेवून दरवाजात यायची आणि तुम्ही पोहचायचे.'

काका : मी तीस वर्षे नोकरी केली. पण मला आजपर्यंत हे समजले नाही की, मी यायचो त्यामुळे तू पाणी आणायचीस की तू पाणी आणायचीस त्यामुळे मी लवकर यायचो.

काकू : हो आणि अजून एक आठवते की तुम्ही रिटायर व्हायच्या आधी तुम्हाला डायबीटीज नव्हता व मी तुमची आवडती खीर बनवायचे तेव्हा तुम्ही म्हणायचे की आज दुपारीच वाटले होते की आज खीर खायला मिळाली तर काय मजा येईल.

काका : हो ना .. अगदी. ऑफिस मधून निघतांना मी जो ही विचार करायचो घरी आल्यावर बघतो तर तू तेच बनवलेले असायचे.

काकू : आणि तुम्हाला आठवते? पहिल्या डिलीवरीच्यी वेळी मी माहेरी गेले होते तेव्हा मला कळा सुरू झाल्या होत्या. मला वाटले हे जर माझ्याजवळ असते तर? आणि काय आश्चर्य तासाभरात तर स्वप्नवत तुम्ही माझ्याजवळ होतात.

काका : हो त्या दिवशी मनात विचार आला होता की तुला जाऊन जरा बघूयात.

काकू : आणि तुम्ही माझ्या डोळ्यात डोळे घालून कवितेच्या दोन ओळी बोलायचे.

काका : हो आणि तू लाजून पापण्या मिटवायचीस व मी त्या कवितेला तुझा 'लाइक' मिळाला असे समजायचो.

काकू : एकदा दुपारी चहा करतांना मला भाजले होते त्याच दिवशी सायंकाळी तुम्ही बर्नोलची ट्यूब आपल्या खिशातून काढून बोलले याला कपाटात ठेव. काका : हो..आदल्या दिवशीच मी बघितले होते की ट्यूब संपलीय. काय सांगता येते कधी गरज पडेल ते? हा विचार करून मी ट्यूब आणली होती.

काकू : तुम्ही म्हणायचे की आज ऑफिस संपल्यावर तू तिथेच ये सिनेमा बघूयात आणि जेवण पण बाहेरच करूयात.

काका : आणि जेव्हा तू यायचीस तर मी जो विचार केलेला असायचा तू अगदी तीच साडी घालून यायचीस.

काका काकूजवळ जावून तिचा हात हातात घेत बोलले : हो, आपल्या जमान्यात मोबाइल नव्हते, पण आपण होतो.

काकू : आज मुलगा आणि सून सोबत तर असतात, पण गप्पा नाही, तर व्हाट्सएप असते. आपुलकी नाही तर टैग असते. केमिस्ट्री नव्हे तर कॉमेंट असते. लव नाही तर लाइक असते. गोड थट्टामस्करीच्या ऐवजी अनफ्रेन्ड असते. त्यांना मुले नकोत तर कैन्डीक्रश सागा, टेम्पल रन आणि सबवे सर्फर्स पाहिजे.

काका : जाऊ दे गं! सोड हे सगळे. आपण आता व्हायब्रेट मोडवर आहोत. आपल्या बॅटरीची पण 1 च लाइन उरली आहे.

अरे! कुठे चाललीस?

काकू : चहा बनवायला.

काका : अरे... मी म्हणणारच होतो की चहा बनव म्हणून.

काकू : माहिती आहे. मी अजूनही कवरेज क्षेत्रात आहे आणि मेसेजेस पण येतात.

दोघेही हसायला लागले.

काका : बरे झाले आपल्या जमान्यात मोबाइल नव्हते. खरेच आतापर्यंत बरेच काही निसटून गेलेय व बरेच काही निसटून जाईल. बहुतेक आपली ही शेवटची पिढी असेल की जिला प्रेम, स्नेह, आपलेपणा, सदाचार आणि सन्मानाचा प्रसाद वर्तमान पीढीला वाटावा लागेल. गरजेचे पण आहे. ■ ■

**प्रत्येक प्रेमळ जोडप्यास**



# भीम जयंती - बुद्ध जयंती कशी साजरी करावी ?

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे राष्ट्रीय थोर पुरुष. जगातील सहाव्या क्रमांकाचे विद्वान. भारतीय घटनेचे शिल्पकार. भारतीय विकासाला दिशा देणारा द्रष्टा. भारतातील अर्थतज्ञ. भारतीय समाजात सुधारणा घडवून आणणारा समाज सुधारक. शेती विकासासाठी नदी जोड प्रकल्पाची संकल्पना सांगणारा. भारतीय रिझर्व्ह बँक स्थापनेची प्रेरणा देणारा. भारतीय बहुजन समाजाला आणि महिलांना निवडणुकीत मतदानाचा हक्क मिळवून देणारा. महिलांना हिंदू कोड बिल देऊन गुलामीतून मुक्ती देणारा. सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी जीवाचे रान करणारा सामाजिक क्रांतिकारक. हे सर्व भारतीय समाजासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महत्त्व सांगणारे काही अपूर्ण मुद्दे.**

अस्पृश्यतेचे अग्नीत होरपळून निघालेल्या लोकांसाठी जन्मदात्या आई वडीलांपेक्षा आणि प्राणापेक्षा जास्त प्रिय असणारा सर्वांचा बाबासाहेब. देव आणि ईश्वर मानणाऱ्यासाठी देवाधीदेव. डॉ. बाबासाहेब सोडून कुणी मोठे श्रद्धास्थान आमचे जीवनात नाहीच. अस्पृश्य समाजातून डॉ. बाबासाहेब वजा केले तर हा समाज गुलाम म्हणून शिल्लक राहतो. म्हणून इतर भारतीय समाजापेक्षा बौद्ध समाजाला डॉ. बाबासाहेब जीव की प्राण. बौद्ध जगासाठी बोधिसत्व. जगातील बौद्ध लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बोधिसत्व म्हणून पूजतात. बौद्ध धम्म तत्वज्ञानात जगासाठी जन्मभर झटणाऱ्या त्यागी, शीलवान, विद्वान व्यक्तीस बोधिसत्व म्हणतात. बौद्धांचे दृष्टीने ते बोधिसत्व होत. डॉ. बाबासाहेबांचे तीन गुरू - बुद्ध, फुले, कबीर. हे तीन फॉर्म आहेत. धर्म असावा बुद्धासारखा, संत असावा कबिरासारखा, पुढारी असावा महात्मा ज्योतिबा फुलेंसारखा हे ते सूत्र. बुद्ध म्हणजे अर्हत सम्यक संबुद्ध. निर्वाणाच्या परम सुख प्राप्तीचा मार्गदाता. प्रथम महान मनोवैज्ञानिक. जगातील बुद्धीप्रामाण्यवादी लोकांचा गुरू. समाजाची पुनर्रचना सांगणारा समाज शास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ. अशा या दोन महापुरुषांची जयंती म्हणजे बौद्धांचे मोठे सण आहेत. ते कसे साजरे केले जावेत? हा प्रश्न समाजाच्या मनात आहे. समाज म्हणजे समाजातील बुद्धिजीवी लोक. ज्यांना समाजाचे दुःख कळते. सुख कशात आहे ते कळते. समाजाला कोणती दिशा द्यावी हे कळते. समाजाचे कुठे चुकते हे कळते. समाजासमोर येणारे संकट कोणते आहेत हे कळते. त्यातून मार्ग कसा मिळेल हे कळते. त्याला बुद्धीजीवी समाज म्हणतात. रस्त्याने चालणारा किड्या माकोड्यासारखा समुदाय म्हणजे समाज नव्हे.

सर्वसामान्य समाज हा अनुकरणप्रिय असतो. त्याचेवर प्रभाव असतो बहुसंख्य लोकांचा. ते जसे करतात तसे आपण करावे हे त्यांच्या मेंदूत घट्ट बसलेले असते. बाकी बुद्धी नसतेच. अभ्यास, अनुभव, चिंतन, मनन नसल्यामुळे तो बऱ्या वाईटाचा विचार करीत नसतो. तो केवळ तुलना करतो. तो स्वाभिमानी असतो. पण त्यांचे म्हणजे गणपती उतसावापेक्षा आपले धूमधडाक्यात झाले पाहिजे ही त्याची भावना असते. या अशा भावनिक लोकांची संख्या जास्त असते. त्यामुळे ते आक्रमक असतात. त्यांचे पुढे बुद्धिजीवी हतबल होऊन बसतात. दुसरा महत्त्वाचा वाईट भाग म्हणजे यांचा वापर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक आड मार्गाने करतात. त्यांना पैसे देतात. ते अर्धे खातात आणि बाकी खर्च करतात. संघाला तेच अपेक्षित असते. समाजाला ती वाईट संवय लावायची असते. त्यात ते असे गरजू, व्येंधळे, लाचार लोक शोधतच असतात. दोघांचीही गरज भागते. ते दोघे मिळून समाजाचा घात करतात. ही समाजाची चिंता आहे. जयंती साजरी करण्यासाठी सर्व समाजाने सकाळी झोपेतून उठावे. आंघोळ करावी. सर्वांनी मिळून बुद्ध विहारात जावे. सर्वांनी पांढरे नवे कपडे घालावेत. घर सजवावे. लाईटिंग करावे. तोरणे बांधावीत. पंचशील ध्वज घरावर बांधावा. घरी गोडधोड पंचपक्वान्न करावे. मित्रमंडळींना आपल्या घरी फराळाला बोलवावे. परिसर स्वच्छ करावा. बुद्ध विहारात प्रवचन आयोजित करावे आणि लोकांनी ते ऐकावे. शंभर लोकांनी भाषणे करून लोकांना त्रासून सोडू नये. मुख्य भाषण किंवा प्रवचन, प्रास्ताविक, अध्यक्ष, संचालक, आभार प्रदर्शन करणारा या पाच लोकांची भूमिका असावी. आभार प्रदर्शन करणाऱ्यांनी भाषण करू नये. विश्लेषण करू नये. प्रास्ताविक करणाऱ्यांनी देखील भाषण करू नये. काय, कशासाठी, कोण आणि आपली जबाबदारी येवढेच त्यांनी सांगावे. फार झाले तर दहा मिनिट बोलावे. आभार प्रदर्शन पाच मिनिट. अध्यक्ष तीस मिनिट. प्रमुख भाषण 45 ते 60 मिनिट असावे. यापेक्षा कुणीही व्यर्थ बडबड करू नये. तरच त्यात आनंद राहील. चैतन्य निर्माण होईल. होत असेल तर प्रभात फेरी काढण्यात यावी. सकाळी 8 ते 9 वाजे पर्यंत. त्यात समूह गीत म्हणावेत. बोधप्रद घोषणा द्याव्यात. हातात पंचशील ध्वज घ्यावेत. लेझिम किंवा वाद्य असेल तर ठेवावे. पण डी.जे. ठेऊ नये. दारू पिऊन धिंगाणा घालून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची हानी करू नये. सांस्कृतिक कार्यक्रम ठेवावेत. नाटके, नृत्य, गाणी ठेवावी, प्रबोधन संगीत कार्यक्रम ठेवावेत.

हजारो लोक एका ठिकाणी एका वेळी मात्र एकत्र यावेत. सकाळी आपल्या विहारात कार्यक्रम आणि सायंकाळी सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. भव्य मंडप, मंच, बसायला खुर्च्या, लाईट आणि ध्वनीक्षेपक व्यवस्था उचित पद्धतीने करावी. आनंद, ज्ञान, संघ शक्ती, चळवळीचा विस्तार होईल अशी भाषणे असावीत. इतरांस दोष देऊन वेळ बरबाद करण्यापेक्षा बुद्ध आणि डॉ. बाबासाहेबांबाबत जी माहिती नाही ती माहिती रंजक पद्धतीने सांगावी. अश्या वक्त्यास निमंत्रित करावे. त्यांना सन्मानित करावे. त्यांना मानधन देऊन आणि सत्कार करून प्रोत्साहित करावे. आनंदी आनंद निर्माण व्हावा. सर्वांची मंगल कामना करावी. सर्वांची गळा भेट घ्यावी. सर्वांना क्षमा करावी. आपसात मैत्री वाढवावी. शहरात मोठ्या वस्त्या आणि अनेक बुद्ध विहार आहेत. संपूर्ण शहराचा एक कार्यक्रम असावा. नागपूर मध्ये सहा झोन आहेत. दुसऱ्या दिवशी सहा झोनमध्ये सहा झोनल कार्यक्रम व्हावेत. त्यानंतर वस्ती निहाय कार्यक्रम व्हावेत. यामुळे संघ शक्ती वाढेल.

ब्राम्हण धर्माचे लोक गणपती, दुर्गा, राम नवमी, शिव जयंती हे दिवस ज्या पद्धतीने साजरी करतात ती पद्धती भीम जयंती आणि बुद्ध जयंती करीता लागू पडत नाही. ते अनुकरण आपण करू नये. तो बहुजन समाजाला गुलाम करण्यासाठी लावलेला फास आहे. भीम आणि बुद्ध जयंती गुलाम मुक्तीचे प्रतीक आहेत. त्यामुळे ती एक क्रांती आहे. दुसरी प्रतिक्रांती आहे. भीम बुद्ध जयंती क्रांती आहे. बाकी प्रतिक्रांती आहे. या दोन वेगळ्या वेगळ्या बाबी आहेत. तेव्हा त्याच्या पद्धती वेगवेगळ्या राहतील. आपण धांगडधिंगा करू नये. शिस्त, मैत्री, सदाचार, प्रबोधन, सेवा, दान हे आपले सूत्र आहे. लोकांना त्रास होईल असे आपले वर्तन नसावे. आपण आपला आदर्श निर्माण करावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सांगणे होते, 'महारांनी बौद्ध धर्म बाटवला असे लांछन आपल्यावर लागू नये असे वर्तन करा. गळ्यात मढे लटकवले असा बौद्ध धम्म घेतला असे होता कामा नये.' काल आपण अडाणी होतो. गरीब होतो. आज उच्च विद्या विभूषित आहोत. झोपडीचे महाल झालेत. प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इंजिनीअर्स, पत्रकार, उद्योजक, अधिकारी, कर्मचारी लाखाच्या संख्येत आहोत. त्यामुळे सर्वांनी मिळून भीम बुद्ध जयंतीचे सण आदर्श सण उत्सव म्हणून साजरे केले पाहिजे. इतर समाजाला आपण त्यात जोडले पाहिजे. बुद्ध-आंबेडकर यांच्या गळी उतरवले पाहिजे. शिव्या देणे टाळले पाहिजे. मैत्रीपूर्ण, विद्वत्तापूर्ण भाषणे आणि प्रवचने व्हावीत. गेट लावावेत. शहरात वातावरण निर्मिती करावी. मुसलमान, ख्रिश्चन, शीख या धर्माचे लोक आपले सण साजरे करतात. त्यात त्यांची संस्कृती दिसून येते. आम्ही मात्र ब्राम्हणांची नक्कल करून आमची बौद्धिक दिवाळखोरी प्रदर्शित करतो. आपल्या संस्कृतीनुसार जयंती साजरी करण्यात आली पाहिजे. खंडणी मागून जयंती साजरी करू नये. जे हे पाप करतात त्यांना प्रेमाने आवर घाला. त्यांचे कार्यक्रमावर बहिष्कार टाकावा. युवक, विद्यार्थी, महिला यांच्या विविध स्पर्धा घ्या. त्यांना व्यक्त होऊ द्या. त्यांना दुर्लक्षित करू नका.

पंगत हा प्रकार म्हणजे महिलांचा आवडता विषय. आपण इतरांकडून धन जमा करायचे आणि आपणच खायचे. दुसऱ्यांना भोजन करायला बोलावले तर असेही नाही. हा विचित्र प्रकार आहे या बद्दल देखील विचार झाला पाहिजे. समाज परिवर्तन, राष्ट्र निर्मिती, मानवता प्रस्थापित करण्यासाठी बुद्ध - भीम जयंतीचा उपयोग करावा हीच सर्व बौद्धांची इच्छा आहे. ■ ■

**लेखांक १०५**



**अशोक सरस्वती बोधी**
**मो. 8530980741**



# इतिहास संदेश

पूर्ण फुल एप्रिल महिना हा इतिहासाने भरला आहे. (1) दि. 1 एप्रिल 1935 साली बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 1925 च्या शोध प्रबंध प्रॉब्लेम ऑफ रूपी या विश्व विख्यात शोध ग्रंथानुसार सगळ्या टोटल बँकांची बँक रिजर्व बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. (2) दि. 3 एप्रिल या दिवसाला छ. शिवरायांचा स्मृतिदिवस. शिवरायांचा मृत्यू नाहीतर रायगडावर स्वराज्य विरोधी शातिर मनुस्मृतिच्या भटांनी सुनियोजित हत्याकांड घडवून आणला, विर राजे सम्भाजी यांना अनेक दिवस भटांनी मरणाचा हत्याकांडचा पता लागु दिला नाही. विर शुर संभाजी राजांनी शेकडो आरोपी, हत्यारे भटांना हत्तिच्या पायाखाली तुडवून मारले, जबरदस्त सजा दिली. ब्रम्ह हत्या पाप आहे, असे प्रचलन करुन ठेवलेल्या बामणी कायद्याला तुडवित छ. शिवरायांच्या हत्येस कारणीभूत असलेल्या आतंकवादि भटांना सजा देण्यात आलि होती, (3) दि. 6 एप्रिल चक्रवर्ती नागराजा सम्राट अशोक जयंती. (4) दि. 8 एप्रिल छ. शिवराय जयंती महान इतिहासकारांनी रिसर्च केला आहे, (5) दि. अकरा एप्रिलला राष्ट्रपिता जोतिबा फुले जयंती आहे, तर याच दिवसाला पुण्याच्या पेशवा शनिवार वाड्याला आग लागुन परीपुर्ण जळून खाक झाला होता. जोतिबाच्या जन्माने मनुस्मृतिच्या रक्षक व बहुजन व महारांचे अगदी वाईट हाल करणारे पेशव्यांना निसर्गाने जणूकाही ईशाराच दिला कि याच पुण्यात तुमचा कर्दनकाळ आला आहे, असा ईशारा होता जोतिबाच्या जन्माने, (6) 14 एप्रिल 1891 ला देशाच्या मिलटरी छावनी महु, जि. इंदोर, म.प्र. येथे सुभेदार रामजी बाबा व आई भिमाईच्या पोटी जन्मा आले बाळ भीमराव रामजी भिमाई आंबेडकर (सकपाळ, आम्बावडेकर, पुढे आम्बेडकर, तिन आडनाव,) (7) दि. 30 एप्रिलला नागपूर हायकोर्टात येऊन बॅरि. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्याने आजादिच्या आन्दोलनमधे, सन्त अगनदास म.प्र. येथील लहान खालच्या कोर्टात जि फाशिची सजा सुनावली होती अशी केस हाताळण्या जयभीम घोषचे जनक कामठीचे युवा नायक बाबु हरदास एल. एन. यांनी सरळ मुम्बईला जाऊन डॉ. बाबासाहेबांकडे केस पोहचविली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब नागपुर हायकोर्टमधे कडकडत्या ऊन्हात येवुन जबरदस्त हेरिन्ग केली व सन्त अगनदास यांना फाशीतून डॉ. बाबासाहेबांनी वाचविले. इथे हायकोर्टमधे चाहता वर्ग जमा झाला होता. लोकांच्या गर्दीचा त्रास झाला होता, तर डॉ. बाबासाहेब लोकांना म्हणाले होते, मी इथे कोणत्या समाज कामासाठी आलो नाही. मी आपल्या सरकारी कामावर आलो. तर इथे नारे लावुन त्रास देवु नका. लोक मग शान्त झाले. या केसकरिता डॉ. बाबासाहेब इकडे आले, याचे औचित्य साधुन बाबु हरदास यांनी कामठी येथे सायंकाळी श्री. टुरिन्ग टॉकीजमधे एक सामाजिक सत्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा घडवून आणला होता, तर याच टॉकीज पुढेच अगदि लागुन नागमित्र धर्मेश पाटील यांच्या आईचे माहेर घर दिवं. विक्रांत सनकाडे (व्यापारी व किर्तनकार व सामाजिक योगदान देणारे सक्रिय कार्यकर्ता) असल्यामुळे या घरी रात्री मुक्काम छान व्यवस्था लावण्यात आली होती. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सनकाडे परिवारमधे आराम केलेला जुना डिझाईनचा पलंग आई लिलाबाई सनकाडे (पाटील)यांनि 1960 साली आमचे मुळ गाव भीवापुर येथे एक खास वस्तु म्हणून जपून ठेवला आहे, तर आता हा पलंग सत्य शोधक समाज प्रवक्ता, नागमित्र धर्मेश पु. पाटीलकडे खामला, नागपूर येथे आहे. 4 ऑक्टो. 1989 साली बहुजन नायक मान. कान्शिरामजी साहेब जेव्हा नागपूर ब्रम्हपुरी दौरा असताना हायवे रोड टच घर व तालुका संयोजक बामसेफ संयोजक माझे वडिल, पुरुषोत्तम रामचंद्र पाटील हे असल्यामुळे मान, कान्शिरामजी साहेबांनी आपला मोर्चा आमच्या घराकडे काही वेळाकरिता वळविला होता. मी नागमित्र धर्मेश तेव्हा 12 वित होतो तर, मनात छान भावना ठेवुन याच पलंगावर साहेब कान्शिरामजींना बसविले होते, असा, इतिहास आहे बन्धुनो. तर जे जे, महापुरुष या एप्रिल महिन्यात जयंति आहेत तर सगळ्यांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा! ■ ■

**नागमित्र धर्मेश पाटील**
**मो.9325146734**

# कोण म्हणते तू म्हातारा झाला?

आत्ताशिक तर तू फक्त साठीचा झाला, मी आता थकलो, दमलो असे सारखे सारखे म्हणू नको, गड्या रे तुला विनंती आहे. बळेच म्हातारपण आणू नको, आता सुन आली, नातू झाला, नात झाली, जावई आला म्हणजे म्हातारपण येत नसते, स्वतःकडे लक्ष द्यायचे सोडले कि वार्धक्य येत असते. डाय कर, करू नको हा तुझा वैयक्तिक प्रश्न आहे. नीटनेटके टापटीप राहयचे एव्हढेच आमचे म्हणणे आहे.

बैलाला झुली घातल्यासारखे गबाळे ड्रेस घालू नको. उगीचच अधर अधर जीव गेल्यासारखे चालू नको. लोकांनी आपल्याला काहीही म्हणो आपण मात्र स्वतःला सुंदर समजावे, रिटायर्ड झालो, साठी आली तरी रोमॅंटीक गाणे गात राहावे.

पोथ्या, पुराणे, जपतप, कुलाचार याला आमचा विरोध नाही. पण मी आता म्हातारा झालो असे अजिबात म्हणायचे नाही. जरी साठी आली तरी स्वतःसाठी वेळ द्यायचा. मित्र- मैत्रिणीचा गृप करायचा व ट्रीपला जायचा प्लॅन करायचा अन् जीवनाचा आनंद घ्यायचा आणि हो दुःखाचे तुणतुणे वाजवायचे नाही. प्रारब्ध प्रारब्ध म्हणून रडायचे नाही. घराच्या बाहेर पडायचे. मोकळा श्वास घ्यायचा आणि हिरव्यागार निर्सगाला पाहून धुंद होऊन मारवा गायचा. फिट राहण्यासाठी सगळे करायचे, हलकासा व्यायाम, योगा आणि थोडा मॉर्निंग वॉक, फेशियल, मसाज, स्टीम बाथ. सगळे कसे नियमित करायचे. कुडत कुडत जगायचे नाही अन् म्हातारपण आले असे म्हणायचे नाही...



साठाव्या वर्षी फॅशन करू नये असे कुणी सांगितले? पॅन्ट, टी शर्ट सगळे घालायचे. श आणि गळम्यासारखे नाही तर मस्त ऐटीत, टाईट चालायचे. नको बाबा लोक काय म्हणतील? अरे म्हणाला का? पुन्हा लोक काय म्हणतील. मग ट्रीपला काय पंजा, धोतर, मेणचट पायजमे, कोपऱ्या घेऊन जाणार का? अरे बाबा जगाची फिकीर करायची नाय अन् म्हातारो झालो असे म्हणयाचे नाही... हे सगळे तू का करायचे? ते नीट समजून घे. कारण तू घराचा पोशिंदा आहेस. कुटुंबाचा आधार आहेस, वास्तु नावाच्या पंढरपुरातला मंजूळ असा विणा आहेस. तुझे शारीरीक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहिले तरच घर आनंदी राहणार आहे. देवघरात दिवा लावून घराच्या प्रांगणात चैतन्याचा वास दरवळणार आहे. घरा-घरात संस्काराचा पाढा आणि अंगभूत शिस्तीचा झरा वाहण्यासाठी तुझे मन प्रसन्न असणे खूप गरजेचे आहे. ■ ■

**अनिल कुमार**



# हृदयस्पर्शी !!

काल एक धक्का बसला. अजुनही सावरलो नाही. एका बांधकामाच्या साईटवर कामगारांची काही मुले खेळत होती. वॉचमनचा छोटा पोरगा (साधारण वय वर्ष आठ) एका कोपऱ्यात बसून ईतरांचा पकडापकडीचा खेळ बघत होता. कुणी धडपडले तर टाळ्या वाजवत होता, हसत होता. पण खेळत नव्हता. मी त्याला विचारले...'बारक्या! तू का रे खेळत नाहीस?' त्याने खेळावरील नजर न हटवता मला ऊत्तर दिले, 'आय नको म्हनत्या ....' 'आई खेळायला कशाला नको म्हणेल? तूच काहीतरी आगाऊपणा करत असशील!'

त्याने ऊत्तर देण्याचे टाळले.

माझ्याकडे एक कटाक्ष टाकून पुन्हा खेळ बघत बसला. मलाच त्याला चिडवण्याची खुमखूमी गप्प बसू देईना. 'मला माहीती आहे, आई तुला खेळायला का नको म्हणते!!! अजिबात अभ्यास करत नसशील!!!' माझा टोमणा त्याला बरोबर बसला असावा. खेळातला खेळकरपणा त्याच्या चेहऱ्यावरून गायब झाला. त्याने थेट माझ्या नजरेला नजर भिडवली, जगातले विखारी सत्य त्याने मला सांगितले. 'आई म्हनत्या... खेळू नको..खेळून भुक लागेल...मग खायला मागशील.'

त्याच्या डोळ्यात किंचीत पाणी आले होते. तडातडा ऊठून तो कुठेतरी निघून गेला. मी अजूनही बेचैन आहे आणि गेल्या वर्षभरात भुक लागावी, अन्न पचावे म्हणून औषधांवर किती खर्च केला याचा हिशोब करत बसलो. म्हणून अन्न ताटात वाया घालवु नये. ■ ■

**- अनामिका**

# अल्पपरिचय सभा, समारंभ व इतर वृत्त : बहिष्कृत भारत

*बंधू आणि भगिनींनो वरीलप्रमाणे अनेक वृत्तांत सध्याच्या परिस्थितीत दैनिक बहुजन सौरभ घेत असते. आपले जाहिरातपत्र नाही, विचारपत्र आहे. या सर्व पार्श्वभूमीवर दैनिक बहुजन सौरभ विकत घेऊन वाचा इतकेच.*

3 एप्रिल 1927 ला संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथून बहिष्कृत भारत वृत्तपत्र प्रकाशित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनवरुन भारतात आले आणि त्यांना वृत्तपत्राची गरज भासू लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंग्रजी भाषेवर प्रचंड असे प्रभुत्व होते. परंतु त्यांची सर्व वृत्तपत्र ही मराठीतूनच प्रकाशित झाली. आमच्या वाचकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व वर्तमानपत्र हे आंबेडकर चळवळीसाठी मोठा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. सामाजिक जनजागृतीसाठी त्यांनी विविध वर्तमानपत्रांचा विविध वर्तमानपत्रांना जन्म दिला. ती धुरा स्वतःच्या खांद्यावरती त्यांनी घेतली होती. वृत्तपत्राचे अत्यंत कठीण काम त्यांनी आपल्या हातात घेतले. त्या काळात किती त्रास सहन करावा लागला त्यांना ही जाणीव आजच्या पिढीला व्हावी या उद्देशाने दैनिक बहुजन सौरभ बहिष्कृत भारत वर्धापन दिवस साजरा करीत आहे. बहिष्कृत भारत वर्तमानपत्र लेखनातून, भाषणातून, विविध प्रसंगातून, त्यांनी माणुसकीची चळवळ निर्माण केली. अस्पृश्यांनाही माणसासारखे वागवा अशी त्यांनी हाक दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहकार्याने वेळ, काळ, पैसा दिला आणि शक्य होईल ती मदत केली. बहिष्कृत भारत अंकात अनेक सदर सुरू करून त्यातील माहिती आपल्या वाचकांना करून दिलेली आहे.

ही माहिती आजही तितकीच प्रसंगिक आहे. बहिष्कृत भारत हे जरी पाक्षिक असले तरी लोक मोठ्या आतुरतेने डॉ. बाबासाहेबांच्या सर्व वर्तमानपत्राची वाट बघत राहत होते. ही चिंतन मंथन करणारी बाब आहे. त्या काळात डॉ. बाबासाहेबांनी वृत्तपत्र घेण्यासंदर्भात हाक द्यावी लागली. जसे जमेल तसे त्यांनी वृत्तपत्राचे कार्य केले. आज दैनिक बहुजन सौरभ तेच कार्य करित आहे. मागील इतिहासाचा अभ्यास करणे आणि त्याचा मागवा घेणे आणि त्यानुसार पुढील भविष्याची रणनीती तयार करणे हे आपले हे आपले नैतिक कर्तव्य आहे. या कर्तव्यातूनच 3 एप्रिल बहिष्कृत भारत वर्धापन दिवस साजरा होत आहे. बहिष्कृत भारतातील आत्मपरिचय, सभा समारंभ व इतर वृत्त या स्तंभबद्दल आपण थोडक्यात जाणून घेऊया. त्यातील काही सारांश वाचकांसाठी तर आज आपण वाचकांचे मनोगत दैनिक बहुजन सौरभ प्रकाशित करतो तोच वारसा आहे.






बहुजन सौरभ

**महाडला सत्याग्रह पुकारा :-** महाड येथे अस्पृश्यांनी चवदार तळ्यांतले पाणी घेऊन आपला जन्मसिद्ध हक्क बजावला. म्हणून तेथील काही भटजी, शेटजी व भटाळलेले इतर ब्राह्मणेतर यांनी अस्पृश्यांना मारले. या बाबतीत वर्तमान पत्रांतून निरनिराळ्या बाजू पुढे येत आहेत. अशा वेळी अस्पृश्यांनी पुन्हा नेटाने उचल खाऊन त्याच तळ्यावर जाऊन पाणी घेण्याचा हक्क बजवावा. अस्पृश्यांच्या बरोबर आम्ही येण्यास तयार आहोत आणि आमच्या सर्व ब्राह्मणेतर बंधूंना अस्पृश्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याकरता त्यांचे बरोबर येण्यास विनंती करीत आहोत. सार्वजनिक विहिरी, हौद, पाणवठे व देवळे या निकडीच्या प्रश्नाचा कायमचा निकाल लावून घ्यावा अशी आम्ही सर्व अस्पृश्य पुढाऱ्यांना विनंती करीत आहोत.

आपले नम्र,
केशवराव जेधे.
दिनकरराव जवळकर



विलास गजभिये
मो. 9421588901

---

**महाडला सत्याग्रह कसा करावा! :-** अस्पृश्यांच्या हक्कांची बजावणी, महाड येथे सत्याग्रह करून करावी अशी आम्ही पुनः विनंती करीत आहोत. सत्याग्रह कसा करावा याबद्दलची आमची योजना या पत्रा-द्वारे प्रसिद्ध करीत आहोंत.

1. सत्याग्रहाला पूर्ण अनत्याचारी स्वरूप असावे.
2. सत्याग्रह यशस्वी होण्याकरता कसलाही ब्राह्मण त्यात समाविष्ट करून घेऊ नये.
3. एक दोन माणसे न पाठविता एकदम हजार पाचशे माणसांनी मंगलवाद्ये वाजवीत हिंदुधर्माची पताका घेऊन - तळ्यांवर जाऊन पाणी प्यावे.
4. देवळे, विहीरी व पाणवठे यांत शिरून आपल्या हक्काची बजावणी करण्याची मोहीम सुरू करण्याकरता खुद्द महाडलाच आणि याच कामाकरता खास परिषद बोलवावी व त्याच दिवशी मिरवणूक काढून तळ्यावर जावे. महाड येथे अस्पृश्यांबरोबर येऊन हिंदुधर्माची अब्रु राखण्याकरिता शेकडोशे ब्राह्मणेतर तरुणांची तयारी आहे अस्पृश्य पुढाऱ्यांनी बिलकूल विलंब न करता आपले निश्चित धोरण प्रसिद्ध करावे आणि ब्राह्मणेतरांनी हिंदू धर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक काढून टाकण्यात मदत करावी.

आपले नम्र,
केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर.
अहमदनगर 19/6/27

---

**महाड येथील सत्याग्रहाची पूर्व तयारी!! :-** महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद भरल्यानंतर तेथील चवदार तळ्यावर जाऊन परिषदेंतील प्रतिनिधि पाणी प्याले म्हणून स्पृश्य वर्गांनी परिषदेच्या प्रतिनिधींवर जो अत्याचार केला व तळ्याची शुद्धी करून बहिष्कृत वर्गावर अपवित्रतेचा शिक्का मारला ती आपली अपवित्रता व तो आपल्यावरील अस्पृश्यतेचा कलंक ज्यांना घालवावा असे वाटत असेल अशा स्वाभिमानी बहिष्कृत वर्गातील स्त्रीपुरुषांनी व इतर जातीतील लोकांनीही बहिष्कृत हितकारिणी सभेच्या विद्यमाने जो लवकरच महाड येथे सत्याग्रह सुरू होणार आहे, त्या सत्याग्रहांत सामिल होण्याकरिता, आपली नांवे बहिष्कृत हितकारीणी सभेचे ऑफीस दामोदर हॉल, परळ, मुंबई येथे नोंदविण्याची त्वरा करावी. कळावे. तारीख 23/6/1927

आपला
सीताराम नामदेव शिवतरकर, जनरल सेक्रेटरी, ब. हितकारिणी सभा.

---

**दुखवट्याची सभा :-** मुंबई कुलाबा दांडी येथील पूर्वास्पृश्यांच्या चाळींत 'श्री. बाळासाहेब आंबेडकर' यांच्या निधनास्तव शनिवार ता. 26 /11 /27 रोजी रात्री 10 वाजता श्री. कोंडदेव श्रीराम खोलवडीकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली होती. सभेला स्त्री व पुरुष मिळून लोक-समुदाय एक हजारावर होता. सभेत पास झालेला ठराव खालीलप्रमाणे होता.

(अ) अस्पृश्यांतील पुढारी व देशाचे नेते डॉ. आंबेडकर यांच्या ज्येष्ठ सहोदराच्या आकस्मिक निधनानें या सभेस भयंकर दुःख होत आहे.

(ब) बंधूच्या आकस्मिक निधनाने जे त्यांना भयंकर दुःख होत आहे त्या दुःखात आम्ही अखिल महाराष्ट्रीय जनता त्यांचे भागीदार आहोत हे लक्षांत घेऊन त्यांनी आपले दुःख कमी करावे ही विनंती. या ठरावावर रा. जाधव, नागांवकर, तिगोटे, जावळे, शिंदे, काळोखे, सकाटे, भंडारी इत्यादि वक्त्यांची विषयानुरूप भाषणे झाली. नंतर सर्वांनी उभे राहून 'परमेश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो' अशी प्रार्थना केल्यावर ठराव पास करण्यात आला. ?

पंधरा मिनिटे सभा स्तब्ध होती. नंतर अध्यक्षाचे कै. बाळासाहेबांच्या माहितीने भरलेले भाषण होऊन त्यांच्या निधनाने आपल्यातील कार्यकर्ता मोहरा नष्ट शाला, त्यांच्यासम आपल्या समाजाला प्रेमळ, विनोदी, निर्भीड आणि निधड्या छातीचा जातिवंत व पिढीवंत वीर दुसरा मिळणे शक्य नाही या गोष्टी श्रोत्यांना कळतांच त्यांच्या तळमळणाऱ्या हृदयांत जास्तच भर टाकून अध्यक्षांनी आपले भाषण पुरे केले. नंतर अध्यक्षांचे व मंडळींचे आभार मानल्यावर सभेचे कार्य संपले.

आपला
धोंडीबा महादेव जाधव ■ ■

---

# परिवर्तन चळवळीतील गायिका
## मैनाताई माणिक कोकाटे

*गायिका मैनाताई माणिक कोकाटे हे नाव मी चाळीस वर्षापासून ऐकून आहे. साधा-सरळ, शांत स्वभाव, समोरील व्यक्तीचा आदर करून बोलणे, स्टेजवर सुद्धा प्रतिस्पर्धी गायकाचा सन्मान करून गायन, प्रेक्षकांनी कितीही आग्रह केला तरी आपल्या मूळ प्रबोधन विषयाशी संबंधित गायन आणि जर प्रतिस्पर्धी कलावंतानी गीतगायनमधून काही शाब्दिक खोडसाळपणा केलाचा तर त्यांच्या सवाल जबाबास तेवढच प्रत्युत्तर आपल्या शेरो-शायरी गीतातून देणारी गायिका. ज्येष्ठ लोककलावंत कवी गायक सोपानअण्णा कोकाटे यांच्यासह मैनाताई आणि माणिकजी कोकाटे या उभयतांच मोलाच सहकार्य, प्रोत्साहन आहे.*

कोकाटे उभयतांनी स्टेजवर आणि कॅसेट, सी.डी.त माझ्या गीतांना स्थान दिले. माझी गाणी महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यात वाडीवस्तीत पोहचवली. 'आदर्श गावं करायचं' या कॅसेट सी.डी. माध्यममधून स्वच्छतेचा, निर्मलग्राम योजना, शिक्षण, पर्यावरण याचा प्रसार प्रचार केला.

आंतरराष्ट्रीय किर्तीचे लोकशाहीर विठ्ठलजी उमप आणि मैनाताईनी गायलें त्याचं कॅसेट मधील

*'झालं ओसाड माळरान आता कळाया लागलं पाणी पाणी करून शेत सुकाया लागलं.'*

माणिकजीचे धाकटे बंधू फुलचंदजी कोकाटे यांनी यातील सर्व गीतांना एका दिवसात चाल लावून संगीतबद्ध केली. ती सर्व गाणी सर्वत्र गाजली. 'क्रांतिकारी भीमवाडी', 'इतिहासाचे बोले पान', 'भिमाई रमाई' आणि अशा अनेक कॅसेटमध्ये गाणी गायली,

*'परदेशाला पती असताना देऊनी साथ श्रमान फुलविला संसार भीमाचा रमान'*

हे मी लिहिलेले गीत गेली पंचवीस वर्ष सर्वत्र गाजत आहे. अनेक कार्यक्रम नफ्यापेक्षा तोटा झाला. पण त्यांनी आयोजक, संयोजक आणि साथीदार यांना दाखविले नाही, या अशा अनेक प्रसंगाचा गेली पंचवीस वर्ष मी साक्षीदार आहे.



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

जीवनातील अनेक प्रसंग अडी-अडचणी यांना त्या सामोऱ्या गेल्या. आजही त्यांना स्वतःचे चांगले घर नाही, आपले गुरु सोपानअण्णा कोकाटे, साहेबराव कोकाटे, भास्कर कोकाटे मावशी प्रख्यात गायिका चंद्रकला गायकवाड यांचा आणि नात्यातील, सहवासातील अनेक कलावंत बंधू भगिनीचा वारसा नी आदर्श त्यांनी जपला आहे. त्यांना सहकार्य मार्गदर्शन करणाऱ्या शेकडो कलावंतांची नावे त्यांनी मला सांगितली, लिहून कळविली. पण लेख मर्यादेमुळे सर्वांचा उल्लेख केलेला नाही. त्यांनी प्रोत्साहन सहकार्य केलेले माझ्यासारखे काही नावारूपास आले याचा त्यांना आनंद वाटतो.

प्रल्हाददादा शिंदे, त्यांची सर्व मुले आनंदजी, मिलिंदजी त्यांचा परिवार, विठ्ठल उमप, विष्णू शिंदे, दत्ता शिंदे, गोविंद गाडेसह कोकणातील नवनीत खरे, जनार्दन धोत्रे असे अनेक जुन्या नवीन कलावंत मंडळीचे ताईना सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले याचाही त्या आवर्जून उल्लेख करतात. मैनाताई यांच्याशी प्रत्यक्ष भेट 2001 झाली. तिथपासून आजमितीस पंचवीस वर्षे आमचे ऋणानुबंध आहेत. ही दोन्ही उभयंता मला आपला भाऊ मानतात. लाखीच जीवन ताईच्या वाट्याला आले, आता हक्काच घं नाही, मोठ्या मुलीं संगीतचे दुःखद निधन, मोठ्या मुलाचे आजाराने, या सर्व प्रसंगात जरी धीराने उभे असले तरी, ताई म्हणतात, आमच्यासारख्या कलावंतांना शासकिय कोट्यातून हक्काचे घर मिळायला हवे, ते मिळावे यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. आपल्या समाजातील बहुतांश चळवळीतील सर्व नेत्यांच्या सभेत गेली चाळीस वर्ष गीते सादर करत आहेत. सर्वांनी त्यांचे कौतुक केले आहे.

महाराष्ट्रातील शेकडो कवी गायक-गायिका ताईंचा आणि ताई त्यांचा आदर करतात. ताईंच्या घरी गेल्यावर त्या स्वतः हार्मोनियम काढणार, सोपान अण्णा, मी, फुलचंद, माणिकभाऊ, त्यांची मुले मग आमची जी मैफिली रंगवायची त्यात दोन तीन वेळा चहा नाष्टा व्हायचा. नवीन गाणे, कॅसेट, यांवर चर्चा केल्या आहेत. कलावंत शब्दाचा नी कौतुकाचा भुकेला असतो. तो या सर्वात आपल दैन्य दुःख विसरतो. ताई त्यातील एक आहेत. स्वाभिमानाने जगणे, स्पष्ट बोलणे, दुसऱ्याचे कौतुक करून प्रोत्साहन देणे हे त्यांच्याकडून शिकावे. हजारात गाणी गाणाऱ्या ताईना आर्थिक लाभ मात्र मिळाला नाही.

माहेरचे नाव मैना पांडुरंग लक्ष्मण बनसोडे. मुक्काम सोन हिवरा, ता. परळी, जिल्हा बीड, आई जिजाबाई, भाऊ जिजाराम, लक्ष्मण, जालिंदर, बंडु, चार भाऊ, आई-वडिलांनी मोल-मजुरी काबाड-कष्ट करून पाच मुलांना वाढविले, शिक्षण देणे परिस्थितीमुळे जमले नाही. तो काळ तसाच होता. तत्कालिन परिस्थिती, रिवाजाप्रमाणे ताईचे लग्न अल्पवयात माणिकजी कोकाटे सोबत फेब्रुवारी 1978 ला झाले, सासर मुक्काम पळस खेड, त्यांनीही आईचा कलेचा वारसा घेतला आहे. सुजाता, सरिता, आदर्श उत्तम गातो, आदर्श उत्तम संगीत, वाद्य साथ, कोरस करतो. कोकाटे परिवार कलावंत, त्यांच्या सहवासात सोपान कोकाटे यांनी मार्गदर्शन केले. कलेतील ते पहिले गुरू आहेत.



बहुजन सौरभ

अशिक्षित मैनाताई गाणे कसे वाचतात, गातात हा गंमतीशीर विषय आहे. कुण्या कवीने जरी मोठ्या अक्षरात गाणे टाईप करून दिले तरी ताईना वाचता येत नाही. मग माणिकजी त्यांच्या अक्षरात कागदावर लिहितात, त्यानंतर त्या बरोबर गातात. ताईही स्वतः गीतलेखन करतात. हार्मोनियम वाजवून गाण गाणे तसे कठीण काम पण गेली पंचेचाळीस वर्ष त्या गात आहेत. 1980 पासून फूटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, सार्वजनिक ठिकाणी प्रेक्षकांना गीते ऐकविले, पन्नास पैसे दोन, पाच ते हल्ली दहा रुपयापर्यंत सोपान कोकाटे, माणिक कोकाटे माझ्यासारख्या इतर कवींची गाणी घेऊन छोटी पुस्तक छापली, शेकडो कॅसेट, सी.डी. त व्हिसिडीत गायन केले आहे. गाणी रेकॉर्ड कशी होतात, त्यातले, संगीत, ट्रॅक, वादन या सर्वांची माहिती या उभयतांनी मला दिली आहे. कलावंतांच्या न्याय हक्कासाठी झटणाऱ्या बौद्ध संगीत कला अकादमी, भारतीय साहित्य कला अकादमी, सम्यक कोकण कला मंच, परिवर्तन कला महासंघ, ऐक्यवादी एकता कला मंच, ऑल इंडिया कला अकादमी या संस्थेत वामन दादा कर्डक हरेंद्र जाधव, ई. एन. निकम, विष्णू शिंदे, दत्ता शिंदे, बी. टी कदम, मंदार कवाडे, नानासाहेब इंदिसे आणि केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब. यांचे प्रोत्साहन सहकार्य मिळाल्याचे ते सांगतात. कलावंतांची, शासन, समाजानी कदर करावी, दखल घ्यावी. आज पर्यंत समाजाने आम्हाला तारले आहे. यापुढेही तारावे ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आपली आई जात्यावर छान ओव्या गायची त्यात ती आवर्जून 'बंधू र शिपाया तू दे रे दे रुपया' हे आणि अनेक गीत छान गायची, मला तिथूनच खरी ओढ होती. सासरच्यांनी हे अचूक ओळखून साथ प्रोत्साहन दिले. आपल्या जीवनाच सोने झाले, शिक्षण नाही त्यामुळे नोकरी नाही. मी अखेरपर्यंत गात राहणार म्हणाल्या. त्यांची गाणी नी वाणी अशी बहरत जावो. हीच मंगल कामना. ■ ■

---



## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

बहुजन सौरभ

### सम्राट अशोक

सुभद्रांगी बिंदुसारचे पोर
शोभे सम्राट अशोक शुरविर
अनेक राज्यांच्या राज्यावर
करून आक्रमण ठरला सामर्थविर॥
कलिंगच्या लढाई नंतर
रक्तपात पाहता दुःख अफार
सैनिकासह प्रश्न केला मनोमनी
पुढील लढाई कधी नाही लढनार॥
भिक्षु निग्रोध अन् उपगुप्त नी
बुध्द धम्म उपदेश केला
अशोक बुध्द-धम्माकडे वळला
बुध्द धम्माचा मध्यममार्ग निवडला॥
बुध्दाचे विचार जगात
बऱ्याच देशांनी केले आत्मसात
बुध्द राष्ट्र म्हणून घोषित
जागतिक इतिहासात॥
देशात शांतता सुख व प्रगती
गुण्या गोविंदाने नांदत होती
राज्याची राज्य व्यवस्था आदर्श होती
'देवानामपिय अशोक पदवी' होती ॥

- देविदास तुळसा शिवाजी भांगे

### चक्रवर्ती सम्राट अशोक

शूर वीर..... पराक्रमी
महायौध्दा... चक्रवर्ती
पाठीवर.. जगाच्या या
अशोकाची प्रज्ञाकिर्ती
झाला प्रीयदर्शी राजा
ज्याचे साम्राज्य विराट
शिलवान ... ध्येयवादी
राजा .. अशोक सम्राट
रक्तपात.... पाहूनिया
मन झालेया.. व्यथीत
कलींगाच्या युध्दातून
दिला.. सोडून अतित
पत्करला.. अहिंसेचा
धम्म मार्ग हा बुध्दाचा
दिला त्यागून तेव्हाच
प्रण सर्वस्वी युध्दाचा
झाले विनाशा समयी
तथा गताचे स्मरण
गेला सम्राट अशोक
बुध्द धम्माला शरण
संघमित्रा महेंद्रानी
केला धम्माचा प्रचार
देश विदेशी जनांना
दिले बुध्दाचे विचार
निर्मियले अशोकाने
स्तुप आणि विद्यापिठ
आंतरराष्ट्रीय दर्जाचे
तिथे गिरविले पाठ
देवनाम प्रिय राजा
सर्व जगात प्रभाव
थोर सम्राट अशोक
हे गौरवशाली नावं

- सुभाष मानवटकर (निळं पाखरु)

### विहाराच्या मुक्तीसाठी लढा आता उभारा!

लाट उसळली बुद्धगयाची
सर्वांनी त्वरा करा,
विहाराच्या मुक्तीसाठी
लढा आता उभारा.. 2
बौद्ध राजे अशोकाने
विहार निर्माण केले..
मनुवादी त्या हिंदुनी
ताब्यात ते घेतले.. 2
डाव त्यांचा मोडून काढण्या..
विशाल संघर्ष करा...
विहाराच्या मुक्तीसाठी
लढा आता उभारा.. 2
साऱ्या जगात प्रथा आहे
ज्यांचे मंदिर ते सांभाळती..
बोधगया चे विहार मग का
बोधाच्या हाती नाही.. 2
मनवाद्यांच्या या कटाला
हाणूनआता पाडा..
विहाराच्या मुक्तीसाठी लढा
आता उभारा.. 2
बाबासाहेबांचे अनुयायी तुम्ही
झोपा का काढता..
निघा आता घराच्या बाहेर
अधिकार आपला मिळवा.. 2
वारसदार तूम्ही खरे बुद्धाचे
जीवन यासाठी घालवा.. 2

विहाराच्या मुक्तीसाठी
लढा आता उभारा.. 2
लाट उसळली बुद्धगयाची
सर्वांनी त्वरा करा..
विहाराच्या मुक्तीसाठी
लढा आता उभारा .. 2

- डॉ. एम. एस. जांभूळे

### पोरी

पोरी....
ठीकच आहे
नेसलीस अंगभर वस्त्र
असू दे सोबतीला
स्वरक्षणार्थ एखाद शस्त्र
पोरी...
ओळखायला शीक
नजरेतला विखार
अती विश्वासाची
होऊ नकोस शिकार पोरी...
प्रयत्न कर आणि स्त्रित्वाची
प्रतिक झुगारून दे..
खुल्या विचाराने
मोकळा श्वास घे... पोरी..
आहे तसे हे माणसांचे गाव
माणसांचे शहर..
लक्षात घे दडलेल मात्र
त्याच्यातल जनावर.. पोरी....
शिकून सवरून मोठी हो...
आकाशाला गवसणी घाल..
विस्कटून टाक
संस्कृती नावाची जुनाट वाट..

- अनिरुद्ध कांबळे

### आम्ही भारतीय सर्व जातीचे गुण्यागोविंदाने नांदतो

आम्ही भारतीय सर्व जातीचे गुण्यागोविंदाने नांदतो
भारतीय महान ईद च्या शुभेच्छा एकमेकांना देतो

मुस्लिम बांधवांचा सण सारेच साजरे करतो
दुजाभाव नाही आम्हाला आमचाच सण वाटतो
मुस्लिम बांधवांकडे शीरखुर्मा प्रेमाने आम्ही खातो
आम्ही भारतीय सर्व जातीचे गुण्यागोविंदाने नांदतो

नमाज अदा करून अल्लाला मागणी असते
सजदा करून अल्लाहला दुवा सहृदय कबुलते
ईदच्या गोडव्याने आपुलकीचा झरा वाहतो
आम्ही भारतीय सर्व जातीचे गुण्यागोविंदाने नांदतो

छोट्या मुलांच्या चेहऱ्यावर ईदीचा बघा आनंद
मोठ्यांनी दिलेली भेट त्यांच्या सुखाचा सुगंध
आशीर्वाद घेऊन सदा प्रेमाचा संदेश बहरतो
आम्ही भारतीय सर्व जातीचे गुण्यागोविंदाने नांदतो

संध्याकाळी मशिदीतून अजान स्वर गुंजतो
शांततेचा तो संदेश सारेच हृदयात साठवतो
प्रेमाची ही परंपरा आम्ही मिळून पुढे नेतो
आम्ही भारतीय सर्व जातीचे गुण्यागोविंदाने नांदतो

ईदचा हा सण जिव्हाळ्याने साजरा करतो
आम्ही भारतीय माणुसकीचाच धर्म निभावतो
ईद असो वा पोर्णिमा सर्व सण सारखे वाटतो
आम्ही भारतीय सर्व जातीचे गुण्यागोविंदाने नांदतो

- मीनाक्षी दमयंती

---

# नि:शब्द..!

आपण प्रेमाने बोलतो तेव्हा प्रेमाचे भाव सहज उमटतात. रागाने बोललो तर रागीट भाव चेहऱ्यावर दिसून येतात आणि जर रागाने बघितले तर समोरच्या व्यक्तीच्या मनावरही नकळत ते रागाचे भाव शब्दासारखे वारे करतात. जर कोणी रडत आवाजात बोलला तर दुःखद भाव त्या चेहऱ्यावर दिसून येतात आणि बघणाऱ्या व्यक्तीच्या मनातही ते भाव बघून दुःखामुळे मन दाटून येते. या निःशब्द बोलण्यातील शब्दांची व्याप्ती खूप मोठी असली तरी समोरच्या व्यक्तीच्या मनाला आपलेसे करणारी असते. आपल्या वेदना, दुःख, प्रेम, आपुलकी सहज आपल्या बोलण्यातून कधी न बोलताही व्यक्त होत असते. ते त्या बोलण्याचा अर्थ आणि त्याला सहाय्य असा प्रतिसाद दिला जातो. जर आपण बोललोच नाही तरी देखील आपला चेहरा आपल्या बोलण्यातील भावना न बोलता सारे व्यक्त करतात. जसे तारुण्यात होणार प्रेम, नजरेला नजर भिडली की नकळत मनामध्ये 'मोगरा फुलतो' जशी प्रेमाची सुरुवात नजर भेटीतून सुरु होते व नंतर प्रत्यक्ष बोलणे सुरु होतात. पण प्रत्येक वेळी माणसाला बोलूनच व्यक्त होता येत नाही. सर्व काही बोलून सांगता ही येत नाही. एखाद्यावर दुःखाचं डोंगर कोसळलेल असेल त्या वेळी तो व्यक्ती आपले दुःख बोलून सांगण्याऐवजी रडत आपले दुःख सांगतो. त्याचे रडणे हे त्याचे, त्याच्या मनातील दुःख व्यक्त करतात. एखाद्या गोष्टीला घेऊन किंवा अचानक हव ते मिळालेले सेल किंवा परीक्षेला म्हणाव त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त गुण मिळाले असेल तर तो आनंद उड्या मारून, जोरात ओरडून, किंवा आपल्या आईला, बहिणीला, भावाला किंवा आपल्या प्रिय बाबाला जोरात मिठी मारून आनंद व्यक्त केला जातो. येथे बोलायची जास्त गरज पडत नाही. सारे काही आपला चेहरा आपल्या मनातील भाव व्यक्त करून देतात. एखादे रडणार बाळ बघितल्यावर सहज लक्षात येते की त्या बाळाला भूक लागलेली आहे. किंवा दूर हात करून रडत असेल तर त्या बाळाला त्याच्या आईकडे जायचे आहे. त्या बाळाला त्याची आई पाहिजे, हे सारे चेहऱ्यावरून दिसून येते. एखादा व्यक्ती खूप शांत असेल तर सहज लक्षात येते की समोरचा व्यक्ती खूप मोठ्या दुःखात आहे. हा भाव जाणून घेण्याची जी मानवनिर्मित क्षमता आहे, ती खूप कमालीची आहे. प्रत्येक व्यक्तीने या क्षमतेचा चांगला उपयोग करावा. आपल्या बोलण्यातील शब्दांचे चढ-उतार, आवाज हे समोरच्या व्यक्तीला आपलस करू शकतात किंवा कायमच दूरही करू शकतात. चेहऱ्याचे हावभाव किंवा आपले बोलणे भांडणाला निमंत्रण देणारे नसावे. आपसात होणारी भांडणे ही एकमेकांच व्यवस्थित बोलणे, बोलण्यातील शब्द समजून न घेतल्यामुळे होतात. समोरचा व्यक्ती जर रागात दिसून येत असेल तर आपण शांत रहावे. जर कोणी रडत असेल तर आपल्या हाताने त्याचे अश्रू पुसावे. आपुलकीचा आधार दयावा. आपण मनुष्य प्राणी आहोत आणि आपल्याला प्रेमाची, माणुसकीची, जिव्हाळ्याची भाषा जास्त आवडते, जास्त कळते. सतत रागात असणारे, आडव बोलणारे, अति मस्करी करणारे, उगाच बडबड करणारे व्यक्ती कोणालाही आवडते नाही. जरा बोलणे कमी आणि न बोलता समजून घेण्यात जो समजूतदारपणा आहे तो कायमचाच नात्यात प्रेमाचा
*गोडवा वाढवणारा असतो.*
*नि:शब्द हळवी आपुलकी*
*आपुलकीचा प्रेमळ शब्द,*
*यात समतोल असावा लागतो.*
*नि:शब्द भावनांना समजून*
*चेहऱ्यावरील अबोला उमजून,*
*नात्याचा निभाव लागतो.* ■ ■

*खरंच, बऱ्याचदा न बोलताही चेहऱ्यावरील हावभाव बरच काही व्यक्त करून जातात. आपण जेव्हा बोलतो तेव्हा आपल्या बोलण्याची शैली, चेहऱ्यावरील हावभाव, प्रत्येक शब्द एक अर्थपूर्ण भाव व्यक्त करतात.*

बहुजन सौरभ



चैताली वरघट
मो. 9834583685

---

अंतःर्मुख करणारे आत्मकथन

# संसाराची बेरीज - वजाबाकी




बहुजन सौरभ

**'बेरीज-वजाबाकी' (प्रेरणा प्रभाईची) हा महाराष्ट्र शासन पुरस्कृत आदर्श शिक्षक, शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांचे अभ्यासक, लेखक आणि फुले-आंबेडकर चळवळीतील विचारवंत प्राचार्य भाऊ वासनिक यांचा आत्मकथनपर संग्रह आहे. यात त्यांनी त्यांच्या जीवनातील बेरीज - वजाबाकीची नोंद घेतलेली आहे. खरेतर मानवी जीवन अतिशय संघर्षमय आहे. यातून कुणाचीही सुटका झालेली नाही. फारतर सुख-दुःखांचे प्रमाण कमी- जास्त असू शकते. 'कौटुंबिक कलह' हा जीवनाचाच भाग आहे. प्रस्तुत आत्मकथनपर संग्रहात एकूण 34 लेख आहेत.**

आपल्या जीवनात आपल्या पत्नीचे मोलाचे योगदान कसे राहिलेले आहे, याचा आलेखच लेखकाने प्रस्तुत पुस्तकात मांडला आहे. त्यांचे कौटुंबिक जीवन आदर्शवत ठरावे, असेच राहिले आहे. अर्थातच याचे संपूर्ण श्रेय त्यांच्या स्मृतिशेष सहचारिणी प्रभावती यांना जाते. खरेतर पती-पत्नी संसार रथाचे चाक असतात, त्यातील एक चाक कमकुवत असू नये, असे जे म्हटले जाते, ते अगदी खरे आहे. अगदी या कसोटीवर वासनिक दांपत्य पूर्णतः उतरलेले आहे. प्रस्तुत आत्मकथनपर पुस्तकाच्या निमित्ताने लेखकाने आपल्या जीवनातील पूर्वस्मृतींना उजाळा दिलेला आहे. खरेतर डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या समाजाच्या निर्मितीत अनेकांचा वाटा राहिलेला आहे. मिलिंद महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्यांनी मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्यात स्वतःला गुंतवून घेतले. त्यात वासनिक सर अपवाद असण्याचे कारण नाही. डॉ. बाबासाहेबांना प्रेरणास्थानी ठेवून कार्य करणारे कृतिशील व्यक्तिमत्त्व म्हणजे प्राचार्य भाऊ वासनिक होत. ते डॉ. बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी आहेत, स्त्री - पुरुष समानतेचे पुरस्कर्ते आहेत. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात स्वाभिमान जपला. अगदी तसाच स्वाभिमान प्राचार्य भाऊ वासनिक यांनी आपल्या आयुष्यात जपला. 35 वर्षे शिक्षण क्षेत्रात सेवा दिली. तसेच यशस्वी प्राचार्य म्हणून कार्य केले आहे. शिक्षण क्षेत्रात अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. आजवर त्यांची शिक्षण क्षेत्राविषयी व फुले- आंबेडकरी चळवळीविषयी एकूण 16 पुस्तके प्रकाशित झाली असून, अनेक पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्याशिवाय अनेक वृत्तपत्रात ते प्रासंगिक, वैचारिक लेखन करतात.

आपल्या प्रिय पत्नी विषयी भावना व्यक्त करताना लेखक भाऊ वासनिक लिहितात,

'प्रभाईन संसाराची बेरीज-वजाबाकी करून संसार सावरला. स्त्री, मुलगी, बहीण, पत्नी, आई अशा विविध भूमिकेत रमते. त्यात तिची ममता, मातृत्व, दातृत्व, दायित्व उचंबळून येते. सहनशीलता, कर्तृत्वशक्ती वाढते. तिची शितलता, स्नेह, प्रेम, आपुलकी भरभरून विस्तारते. हे मी तिच्या सहवासात खूप अनुभवले. ती कुटुंबासह समाजास सहकारी, मार्गदर्शक ठरली. तिने कुटुंबाचे दायित्व स्वीकारले. मुलेमुली, थोरामोठ्यांकरिता कुटुंबवत्सल झाली. पुढे होऊन कुटुंबासाठी स्वबळावर निःसंकोचपणे केले. त्यात कधी माघार घेतली नाही. सर्व काही वेळात केले. वरिष्ठ प्राथमिक शाळेची मुख्याध्यापिका असताना पदाची झलक कधी दाखवली नाही. तिने एकाच वेळेस अनेक पात्र वटवले. मी तिचे अनेक रूप अनुभवले. तिचा सहज स्वभाव मनाला वेधक ठरला. परिवारात लहान असताना सर्वोच्च पदावर कर्तृत्वाने पोहोचली. मला मिळालेल्या विविध पुरस्कारात व लेखनात तिचा सिंहाचा वाटा आहे. तिला मार्ग गवसला. 21 वर्षे झाली. 21 मिनिटासारखी वाटतात. ती हवी-हवीसी असल्याने तिच्या जाण्यावर विश्वास बसत नाही...' कौटुंबिक सौहार्द कसा जपला जाऊ शकतो, हे प्रभावतींच्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध होते. एखाद्याचे दुःख बघितल्यानंतर ममतेने जसे हृदय पिळवटून जाते. भाऊ वासनिकांचे दुःख प्रत्यक्षात बघितल्यानंतर प्रभावतींचे मन कळवळले. त्यातूनच परस्परातील स्नेह कायम राहिले. खरेतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण क्षेत्रासाठी व्यतित केले. त्यांच्या सहकारिणीचे अकाली निधन झाल्यानंतरही फुले-आंबेडकरी चळवळीसाठी कायमस्वरूपी त्यांनी खर्ची घातले. वैचारिक प्रबोधनाला त्यांनी गती दिली. खरेतर डॉ. बाबासाहेबांच्या जीवनात त्यांच्या पत्नीचे जसे महत्त्वाचे स्थान राहिले आहे, अगदी तसेच प्राचार्य भाऊ वासनिक यांच्या जीवनात त्यांची पत्नी प्रभावती यांचे स्थान राहिलेले आहे. लेखक प्राचार्य भाऊ वासनिक पुस्तकाच्या प्रारंभी 'ऋणानुबंध'मध्ये लिहितात, 'कर्तृत्व व जबाबदारी या नाण्याच्या दोन अभिन्न बाजू एकसाथ स्वीकारून ते पेलणारी, सतत राबराब राबणारी म्हणजे प्रभाई. प्रभाई म्हणजे चिंतनशील, निष्कपट, निष्कलंक निर्मळतेचा झरा-प्रभाई, परमार्थासाठी झिजणारा आगळावेगळा नमुना आहे.' प्रस्तुत वाक्यातून आपल्या प्रिय पत्नीविषयी अतिशय उत्तम भावना व्यक्त करून खऱ्या अर्थाने लेखकाने मानवी मूल्यांचे सौंदर्य अत्यंत प्रासादिक शब्दात अधोरेखित केले आहे. तर प्राक्कथनात ते लिहितात, 'ती परिवारासाठी झिजली, शिणली, थकली पण वाकली नाही, ती परिवारासाठी सावध, निर्भिड होऊन विचारशील, मृदुभाषी निर्णायक राहिली. शिक्षिका होऊन शालेय कर्तव्यात, महिला, समाजाच्या पुढाकारात तिं स्थान अग्रस्थानी राहिले.'

'स्त्री- पुरुष' समानतेच्या आजच्या कालखंडात प्राचार्य भाऊ वासनिक यांचे दांपत्य जीवन निश्चितच प्रेरक स्वरूपाचे आहे. त्यांची दोन्ही मुले अतुल आणि अचल अहंकार विरहित जीवन कंठत आहेत. त्यासाठी प्रत्येकाने 'संसाराची बेरीज-वजाबाकी' हे आत्मकथनपर पुस्तक सर्वांनी वाचले पाहिजे.

'संसाराची बेरीज वजाबाकी'
(आत्मकथनपर पुस्तक)
लेखक - प्राचार्य भाऊ वासनिक,
मो. 9423606064
प्रकाशक - पिपल्स प्रकाशन तळेगाव दाभाडे, ता- मावळ, जिल्हा- पुणे सहयोग राशी-250/- रुपये, पृष्ठ-219 ■ ■

समीक्षा



दिनेश कोटांगले
मो.9834492541

